पुण्य नगरी
गुरुवार, दि. ९ एप्रिल २००९

# उद्योजकांनी सीटीसीचा वापर बंद करावा

## • व्ही. एम. मोटघरे यांचे आवाहन • ओझोनच्या थराचे संरक्षण करण्याची गरज




**परिसंवादात नीलिमा डिसिल्व्हा-दळवी, व्ही.एम. वाघमारे, सुधीर पालिवाल व व्ही. रामासुब्रमण्यम.**

नागपूर, दि. ८ (प्रतिनिधी) – सीटीसी अर्थात कार्बोनेट टेट्राक्लोराइड आरोग्य व पर्यावरणाचे नुकसान करते. भारत या घातक विद्राव्याचा उपयोग बंद करीत आहे. उद्योगक्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या सीटीसीवर नियमितपणे नियंत्रित केले पाहिजे. उद्योजकांनी सीटीसीचा वापर बंद करून ओझोनच्या थराचे संरक्षण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी व्ही.एम. मोटघरे यांनी केले.

विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व जीटीझेड-प्रोक्लिमा यांच्या संयुक्त विद्यमाने 'ओझोन थर संरक्षण आणि उद्योगांची भूमिका' या विषयावर बुधवारी सायंकाळी परिसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. उद्योजकांनी सीटीसीऐवजी पर्यायी साधनांचा उपयोग करण्याचा सल्ला त्यांनी दिला. पुढील दोन महिन्यात संबंधित उद्योगधंद्यांनी सीटीसीचा संपूर्णपणे नायनाट झाल्याचा अहवाल सादर करावयास हवा. वास्तविक १७ सप्टेंबर १९९२ साली सीटीसी वापरण्यावर बंदी आणण्याचा कायदा लागू झालेला असून ३१ डिसेंबर २००९ पर्यंत सीटीसीचे उत्पादन बंद व्हायलाच पाहिजे, अन्यथा उत्पादकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

सीटीसी (कार्बन टेट्राक्लोराईड) हे रसायन विविध उद्योगांमध्ये क्लिनिंग एजंट म्हणून वापरले जाते. अज्वलनशीलता, उच्च विद्राव्य शक्ती व कमी किंमत ह्यामुळे हे विद्राव्य बरेच प्रचलित आहे. परंतु सीटीसी हे आरोग्यास व पर्यावरणास घातक आहे. या संदर्भात जनजागृती निर्माण करण्यासाठी हाच परिसंवाद कार्यक्रम आयोजित करण्यामागचा हेतू असल्याचे नीलिमा डिसिल्व्हा-दळवी यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले. ओझोनचा थर पृथ्वीला कसे वाचविते हे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे समजावून सांगितले.

व्हीआयएच्या सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी फोरमचे अध्यक्ष सुधीर पालीवाल यांनी स्वागतपर भाषण केले. ते म्हणाले की, व्हीआयएच्या सहकार्याने जीटीझेड प्रोक्लिमा व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ऑक्टोबर २००७ मध्ये जनजागृती कार्यक्रमाला सुरुवात केली होती आणि आता या कार्यक्रमाच्या माध्यमातून २००९ सालाअखेरीस सीटीसीचा नायनाट होईल, अशी आशा व्यक्त केली.

जीटीझेडचे सल्लागार व्ही. रामासुब्रमण्यम यांनी सीटीसीवर पर्यायी उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. ओझोन थराच्या बचावासाठी प्रत्येक उद्योगाला पर्यायी मार्ग शोधण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले. संचालन व आभार अशित सिन्हा यांनी मानले.